# युवाराष्ट्र दर्शन

RNI No. MAHMAR/2008/26657 E-mail : yuvarashtradarshan.com

नागपूर, शुक्रवार, दिनांक ३० जानेवारी २०२६ ■ वर्ष १७ ■ अंक ३३७ ■ पाने ८ ■ किंमत रु. २/- वितरण खर्च रु.१ = एकूण ३ रुपये


## विशेष संपादकीय

### विलीनीकरण की नवा संघर्ष?

**संदीप काळे**

अजित दादा यांच्या निधनाने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. शरद पवार यांची आता अघोषित सेवानिवृत्ती असेल, दिल्लीचे राजकारण सुप्रिया सुळे यांच्याकडे असेल, दोन्ही राष्ट्रवादी एकत्रित येतील, पार्थ पवार, रोहित पवार पवारांचे राजकारण पुढे चालवतील, हे आज ना उद्या आता पुढे येईल? राज्याच्या राजकारणात सुप्रिया सुळे यांना पवारांच्या कन्या म्हणून अजितदादा यांच्या बहीण म्हणून कितपत स्वीकार करेल यावर शंका आहे. असे अनेक जर तरचे विषय आहेत. दादांच्या जाण्याने राज्याची झालेली हानी कोणीही भरून काढू शकत नाही.

सत्तेचे गणित, पक्षाचे नेतृत्व, प्रशासकीय शिस्त आणि आगामी निवडणुकांची दिशा या सर्व बाबी एकाच वेळी अनिश्चिततेच्या छायेत गेल्या आहेत. अजित पवार हे केवळ एक राजकीय नेते नव्हते, तर निर्णयक्षम प्रशासक, कडक शिस्तीचे प्रतिक आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका गटाचे सर्वस्व होते. त्यांच्या जाण्याने पक्षासमोर नेतृत्वाचा मोठा पेच निर्माण झाला असून, पुढील वाटचाल कोणाच्या हाती जाणार, याबाबत तीव्र चर्चा सुरू झाली आहे.

अजित पवारांच्या पश्चात पक्षाचे नेतृत्व कोण सांभाळणार, यावरून राजकीय वर्तुळात विविध तर्कवितर्क मांडले जात आहेत. राज्यसभा खासदार सुनेत्रा पवार यांच्याकडे पक्षाचे नेतृत्व सोपवले जाऊ शकते, अशी चर्चा जोर धरू लागली आहे. कार्यकर्त्यांमध्ये त्यांच्याबद्दल भावनिक ओलावा असून, पवार कुटुंबाचा चेहरा म्हणून त्या पक्षाला एकत्र ठेवू शकतील, असे मत अनेक नेत्यांकडून व्यक्त होत आहे. दुसरीकडे अजित पवारांचे पुत्र पार्थ पवार राजकारणात सक्रिय असले तरी प्रशासकीय अनुभवाचा अभाव ही त्यांची मर्यादा मानली जात आहे. त्यामुळे सुरुवातीच्या काळात त्यांना सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांसारख्या ज्येष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाखालीच काम करावे लागेल, असे संकेत मिळत आहेत. पक्षाची संघटनात्मक बांधणी, संसदीय राजकारण आणि दिल्लीतील हालचाली हाताळण्यासाठी तटकरे आणि पटेल यांची भूमिका आगामी काळात निर्णायक ठरणार आहे.

दरम्यान, अजित पवारांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमधील दोन गट पुन्हा एकत्र येण्याची चर्चा नव्याने वेग घेत आहे. शरद पवार गट आणि अजित पवार गट यांच्या विलीनीकरणाबाबत आधीपासूनच कुजबुज सुरू होती. ५ फेब्रुवारी २०२६ रोजी होणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकांबाबत दोन्ही गटांनी एकत्र लढण्याचे संकेत यापूर्वीच दिले होते. आता 'दादां'च्या जाण्यामुळे निर्माण झालेल्या भावनिक वातावरणात हे विलीनीकरण जलद गतीने होण्याची शक्यता राजकीय विश्लेषक व्यक्त करत आहेत. मात्र, जर दोन्ही गट एकत्र आले, तर राष्ट्रवादी काँग्रेस पुन्हा महाविकास आघाडीचा भाग बनेल. असे झाल्यास सध्या सत्तेत असलेले ४१ आमदार भाजपसोबतच राहण्यावर ठाम राहिले, तर पक्षात पुन्हा एकदा फूट पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

अजित पवार हे महायुती सरकारमधील अत्यंत महत्त्वाचा दुवा होते. अर्थमंत्री म्हणून त्यांनी २०२५२६ या आर्थिक वर्षाचा सुमारे सात लाख कोटी रुपयांचा अर्थसंकल्प मांडला होता. राज्याच्या आर्थिक नियोजनात त्यांचा अनुभव आणि पकड सर्वमान्य होती. त्यांच्या निधनानंतर हा अर्थसंकल्प प्रभावीपणे राबवणे हे नव्या अर्थमंत्र्यासमोर मोठे आव्हान ठरणार आहे. यासोबतच आगामी निवडणुकांसाठी महायुतीतील जागावाटपाचे गणित ठरवताना अजित पवारांची निर्णायक भूमिका राहायची. आता ही जबाबदारी कोण पार पाडणार, हा प्रश्न महायुतीसमोर उभा राहिला आहे.

बारामतीचा विकास आणि तेथील राजकारण अजित पवारां भोवतीच फिरत होते. त्यांच्या निधनामुळे बारामतीकरांनी आपला राजकीय आधार गमावल्याची भावना व्यक्त होत आहे. पश्चिम महाराष्ट्रातील साखर कारखाने, सहकारी बँका आणि सहकार क्षेत्रात त्यांचा मोठा दबदबा होता. त्यांच्या जाण्याने या क्षेत्रातही नेतृत्वाची मोठी पोकळी निर्माण झाली आहे. 'दादा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अजित पवारांचा कार्यकर्ता वर्ग अत्यंत मोठा आणि कडूर होता. त्यांच्या अचानक जाण्याने कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नैराश्य पसरले असून, अधिकाऱ्यांकडून काम करून घेण्याची त्यांची थेट, कडक आणि परिणामकारक शैली आता कोणाकडेही नसल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

अजित पवारांच्या नेतृत्वाखाली राज्यात अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्पांना गती मिळाली होती, मात्र त्यातील अनेक प्रकल्प अजून अपूर्ण अवस्थेत आहेत. पुणे आणि पिंपरी-चिंचवड मेट्रो विस्तार, पुणे मेट्रो फेज-२ हिंजवडी-चाकण औद्योगिक पट्ट्याला जोडणारी मेट्रो, तसेच पिंपरी ते निगडी मेट्रो मार्ग हे प्रकल्प अजित पवारांच्या विशेष लक्षाखाली होते. जलसंपदा मंत्री म्हणून त्यांनी नार,पार,गिरणा नदीजोड प्रकल्प, भामा,आसखेड फेज,२ आणि पवना धरण ते निगडी बंदिस्त वाहिनी यांसारख्या प्रकल्पांना गती दिली होती. बारामतीला स्मार्ट सिटी म्हणून विकसित करण्याच्या दृष्टीने छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य संग्रहालय आणि माळेगाव नगरपंचायतीचा कायापालट हे प्रकल्पही अजून अंतिम टप्प्यावर आहेत. पुणे रिंग रोड, शिरूर उन्नत महामार्ग, मुळा,मुठा रिव्हरफ्रंट डेव्हलपमेंट, तसेच महाराष्ट्राची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलरवर नेण्याचे २०२६४७ व्हिजन, चाळीस लाख कोटींची गुंतवणूक आणि पन्नास लाख रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट हे सगळे प्रकल्प आणि धोरणे आता नव्या नेतृत्वावर अवलंबून राहणार आहेत. अजित पवारांची काम करण्याची पद्धत अत्यंत काटेकोर होती. ते अनेकदा शनिवार किंवा रविवार सकाळी सहा वाजता स्वतः प्रकल्पस्थळी जाऊन कामाचा आढावा घेत. त्यांच्या निधनानंतर असा कडक फॉलो,अप घेणारा प्रशासक न मिळाल्यास हे महत्त्वाकांक्षी प्रकल्प रेंगाळण्याची भीती राजकीय व प्रशासकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे. अजित पवारांच्या निधनामुळे निर्माण झालेली सहानुभूतीची लाट आगामी निवडणुकांमध्ये पक्षाकडून राजकीयदृष्ट्या वापरण्याचा प्रयत्न केला जाण्याचीही शक्यता आहे. मात्र, ही सहानुभूती नेतृत्वाच्या ठोस निर्णयांमध्ये आणि संघटनात्मक ताकदीत रूपांतरित होते की नाही, यावरच राष्ट्रवादी काँग्रेस आणि महाराष्ट्राच्या राजकारणाची पुढील दिशा ठरणार आहे. आता शरद पवार यांनी मोठे मन करणे आणि सेवानिवृत्ती घोषीत करणे, सुप्रिया सुळे यांनी केवळ दिलीचे राजकारण पाहणे? आणि अजित दादा यांच्यावर अवंलबून असलेल्या, स्वप्ना उराशी बाळगणाऱ्या त्या प्रत्येक नेता, कार्यकर्त्याला न्याय देणे हीच सर्वांच्या मनातील 'मुख्यमंत्री' अजित दादांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे अजित दादांवर प्रेम करणारे अनेक कार्यकर्ते आज बारामती मध्ये उघडपणे बोलत होते.

(लेखक महासागर मीडिया ग्रुपचे मुख्य समूह संपादक आहेत.)

# एका पर्वाचा असाही अंत

## ■ अजितदादा पवार अनंतात विलिन ■ कार्यकर्त्यांचा अश्रूंचा बांध फुटला





अजितदादांना शेवटचा निरोप देताना सुमेत्रा पवार, पार्थ पवार आणि सुप्रिया सुळे शेजारी अजितदादांच्या चाहत्यांची उसळलेली गर्दी.

वृत्तसंस्था
बारामती, दि. २९

ज्या बारामतीमध्ये अजित पवारांना ताकद दिली, त्याच बारामतीच्या मातीत आज एका झंझावाताचा अंत झाला. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवावर गुरुवारी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार पार पडले. सकाळपासूनच बारामतीकडे जाणारे रस्ते जनसागराने ओसंडून वाहत होते. आपल्या लाडक्या नेत्याचे दर्शन घेण्यासाठी प्रत्येक डोळा पाणावलेला होता आणि अश्रूंनी भिजलेली बारामती आज पूर्णपणे सुन्न झाली होती.

एरव्ही राजकीय मैदानात एकमेकांवर तुटून पडणारे नेते एकाच व्यासपीठावर दुःखात बुडालेले दिसून आले. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांनी केंद्र सरकारच्या वतीने अजितदादा यांना आदरांजली अर्पित केली. अजित पवार हे वेळेची मर्यादा पाळणारे असल्याने ठरल्याप्रमाणे सकाळी ११ च्या सुमारास त्यांची अंत्ययात्रा निघाली. तत्पुर्वी विविध पक्षांच्या नेत्यांनी त्यांना पुष्पचक्र अर्पण करून आपली आदरांजली अर्पित केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ गायकवाड यांनी अजितदादांच्या पार्थिवाला खांदा दिला. त्यावेळी त्यांना आपले अश्रू रोखता आले नाही. आमचा एक हात तुटला अशी भावना राज्य मंत्रीमंडळातील सदस्यांनी व्यक्त केली. दुपारी १२ च्या सुमारास बारामती येथील विद्या प्रतिष्ठान येथे अंत्ययात्रा पोहचली.



शरद पवारांचे सांत्वन करताना केंद्रीयमंत्री नितीन गडकरी

### अनेक मान्यवर उपस्थित

याप्रसंगी शरद पवार, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, केंद्रीयमंत्री नितीन गडकरी, रामदास आठवले, जयंत पाटील, दत्ता भरणे, नारा लोकेश, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पंकजा मुंडे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, योगेश जाधव, छगन भुजबळ, चंद्रकांत पाटील, सुनील तटकरे आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

**शासकीय इतमामात अंत्यसंस्कार**

दुपारी १२.३० च्या सुमारास पोलिसांनी हवेत बंदुकीच्या तीन फैरी झाडून शासकीय इतमामात अजितदादांना मानवंदना दिली. बिगुल वाजला आणि आसमंत अजितदादा अमर रहेच्या घोषणांनी भरून गेला. पार्थ आणि जय पवार यांनी जेव्हा मुखाग्नी दिला, त्यावेळी उपस्थित असलेल्या हजारो कार्यकर्त्यांचा संयम सुटला आणि एकच टाहो फोडला गेला.

**आता कुणाला दादा म्हणणार**

आज केवळ एक राजकीय नेता गेला नाही, तर सामान्य माणसांचा, कार्यकर्त्यांचा आणि अधिकाऱ्यांचा हक्काचा आधारस्तंभ कोसळला आहे. मंत्रालयात सकाळी सहा वाजता कामाला लागणारे आणि फाईलवरचे प्रश्न तात्काळ मार्गी लावणारे अजितपर्वाचा योद्धा आता अनंतात विलीन झाला आहे. बारामती आज पोरकी झाली आहे आणि महाराष्ट्राच्या प्रशासकीय वर्तुळात कधीही न भरून निघणारी पोकळी निर्माण झाली आहे.

आता दादा कुणाला म्हणायचे असे कार्यकर्ते ऐकमेकाला विचारताना दिसून आले.



अंत्यसंस्काराला जमलेल्या लोकांचे हात जोडून अभिवादन करताना पार्थ आणि जय पवार

**सुरक्षा रक्षक गहिवरले**

अजित पवार यांच्या पार्थिवाला अग्नी दिल्यानंतर त्यांच्यासोबत राहणारे सुरक्षा रक्षक देखील भाऊक झाले होते. सुरक्षा रक्षकाच्या डोळ्यातून अश्रू वहात होते. ज्या ज्या वेळी अजित पवार हे बारामती येथे असायचे त्यावेळी हे सुरक्षा रक्षक नेहमीच त्यांच्यासोबत असायचे.

## अजितदादांच्या कॅबिनमधील तो जरब आणि माणुसकी कुठे शोधायची

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
मुंबई, दि. २९



ज्यांच्या एका शब्दावर मंत्रालयाचे सहा मजले हादरून निघायचे, ज्यांच्या कडक शिस्तीने बड्या सनदी अधिकाऱ्यांचाही घाम सुटायचा, त्या अजित पवार यांच्या निधनाने आज केवळ त्यांचे कार्यकर्तेच नव्हे, तर त्यांच्या केबिनबाहेर दिवसरात्र तैनात असलेले कर्मचारीही सुन्न झाले आहेत. दादा म्हणजे केवळ सत्तेचे केंद्र नव्हते, तर ते या कर्मचाऱ्यांच्या आयुष्यातील टाईम मॅनेजमेंट आणि शिस्तीचे चालतेबोलते विद्यापीठ होते.

आयटी इंजिनिअर आलम शेख यांच्यासाठी दादांसोबतचे काम म्हणजे एक विलक्षण अनुभव होता. ते सांगतात, ''सकाळी आठची मीटिंग म्हणजे दादा पावणे आठलाच हजर! बैठकीच्या टेबलवर पाण्याची बाटली कोणत्या कोनात ठेवली आहे, इथपासून त्यांचं बारीक लक्ष असायचं. प्रशासनाचा इतका गाढा व्यासंग होता की, एखाद्या फाईलवर त्यांनी वर्षापूर्वी काय सही केली होती, हे त्यांना अचूक आठवायचं. ऑफिसमध्ये कागदाचा कपटा दिसला तरी ते स्वतः उचलायचे आणि मग संबंधित कर्मचाऱ्याची शाळा घ्यायचे. त्यांच्या जाण्याने एक उत्तम प्रशासक आम्ही गमावला आहे.''

गेल्या सहा वर्षांपासून दादांकडे टंकलेखक म्हणून काम करणारे जगदीश कुलकर्णी सांगतात, ''दादा लोकांसाठी राजा होते.

## दादांनी शब्द पाळला नाही : ॲड. कोठारी

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
हिंगणघाट, दि. २९

अवघ्या चार महिण्यांपूर्वी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या लोकार्पण सोहळ्यासाठी अजित पवार आले आणि बहुधा विदर्भातील त्यांचा हा शेवटला दौरा ठरला असावा. बाजार समितीचा कार्यक्रम व पक्ष मेळावा असे दोन वेगवेगळ्या कार्यक्रमात ते उपस्थित होते. ते आपल्या घरी जेवायला आले होते. ते परत जात असताना आपल्या सौभाग्यवतीने आता परत जेवायला कधी येणार असा प्रश्न विचारला. त्यावेळी ते हसत म्हणाले की, तुम्ही नवीन घरी रहायला गेल्यावर नक्की येईल. परंतु, त्यांनी पुन्हा जेवायला येणार असा दिलेला शब्द नियतीने दुर्दैवाने आज खोटा ठरविला असल्याची प्रतिक्रिया हिंगणघाट कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ॲड. सुधीर कोठारी यांनी दिली.

## अजितदादानंतर राज्याची तिजोरी कुणाकडे ?

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
मुंबई, दि. २९

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि राज्याच्या अर्थकारणाचे चाणक्य मानले जाणारे अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे मंत्रालयात आणि राजकीय वर्तुळात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. प्रशासकीय शिस्त आणि अर्थसंकल्पावरील अभ्यासू पकड यासाठी ओळखल्या जाणाऱ्या दादांच्या अनुपस्थितीत आता राज्याचा अर्थगाडा कोण ओढणार? हा प्रश्न सध्या ऐरणीवर आला आहे. अवघ्या तीन आठवड्यांवर आलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर नवीन अर्थमंत्र्यांच्या नावाची उत्सुकता वाढली आहे.

मंत्रालयातील विश्वसनीय सूत्रांच्या माहितीनुसार, अर्थमंत्रालयाची धुरा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वतःच्या खांद्यावर घेण्याची दाट शक्यता आहे. फडणवीस यांनी यापूर्वी अर्थमंत्री म्हणून राज्याचा अर्थसंकल्प यशस्वीपणे मांडला असून, त्यांना या विषयाचा सखोल अनुभव आहे. अजितदादांच्या निधनानंतर निर्माण झालेली आणीबाणीची परिस्थिती आणि अर्थसंकल्पाची तांत्रिक तयारी पाहता, मुख्यमंत्रीच राज्याची तिजोरी आपल्याकडे ठेवतील असे संकेत मिळत आहेत.

राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन २३ फेब्रुवारी २०२६ पासून सुरू होत आहे. अर्थसंकल्पाचे काम सध्या अंतिम टप्प्यात असून, त्याला अंतिम मंजुरी देणारा आणि विधानसभेत तो ठामपणे मांडणारा खंबीर नेता राज्याला हवा आहे. अजित पवार यांनी गेल्या अनेक वर्षांपासून अर्थखात्यावर आपली वेगळी मुद्रा उमटवली होती. आता त्यांच्या अनुपस्थितीत नवीन अर्थमंत्र्यांना प्रशासनाशी समन्वय साधून वेळेत बजेट सादर करण्याचे कठीण आव्हान पेलावे लागणार आहे.

राज्याच्या इतिहासात सर्वाधिक वेळा अर्थसंकल्प मांडण्याचा विक्रम अजित पवार यांच्या नावावर आहे. त्यांनी एकूण १० वेळा राज्याचे बजेट सादर करून एक मानदंड प्रस्थापित केला होता. यंदाचे ११ वे बजेट मांडून स्वतःचाच विक्रम मोडीत काढण्यासाठी दादा सज्ज होते. त्यांच्या बजेटमधील आकडेवारीची मांडणी, रोखठोक उत्तरे आणि शेरोशायरी याला आता महाराष्ट्र मुकणार आहे. महायुतीच्या सत्तावाटपानुसार अर्थखाते हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) कोट्यात होते. मात्र, दादांच्या निधनानंतर त्यांच्या गटातील इतर कोणा ज्येष्ठ नेत्याकडे हे महत्त्वाचे खाते सोपवले जाणार की प्रशासकीय सोयीसाठी मुख्यमंत्री ते स्वतःकडे ठेवणार, याकडे राजकीय विश्लेषकांचे लक्ष लागले आहे. महायुतीच्या कोअर कमिटीच्या बैठकीनंतरच यावर अधिकृत शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे.

## अजितदादांचा घात की अपघात ?

### वादग्रस्त वैमानिकाच्या हाती उपमुख्यमंत्र्यांची सुरक्षा कुणी सोपवली ?

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
मुंबई, दि. २९

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाला कारणीभूत ठरलेल्या विमान अपघाताच्या चौकशीत आता एक असा खुलासा झाला आहे, ज्याने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. ज्या वैमानिकाच्या हातात राज्याच्या दुसऱ्या सर्वोच्च नेत्याची सुरक्षा होती, तो कॅप्टन सुमित कपूर यापूर्वी दोनदा मद्यप्राशन प्रकरणात दोषी आढळला होता. या खळबळजनक माहितीमुळे आता हा केवळ अपघात नसून सुरक्षेतील अक्षम्य हलगर्जीपणा असल्याचे बोलले जात आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, कॅप्टन सुमित कपूर यांचा उड्डाण रेकॉर्ड कमालीचा डागाळलेला आहे. त्यांच्यावर झालेले आरोप खालीलप्रमाणे आहेत:

**दोनदा ब्लॅकलिस्टेड:** २०१० मध्ये दिल्ली-बंगळुरूआणि २०१७ मध्ये दिल्ली-गुवाहाटीउड्डाणापूर्वी झालेल्या वैद्यकीय चाचणीत कपूर दारूच्या नशेत आढळले होते.

**कठोर कारवाई:** वारंवार नियम मोडल्यामुळे नागरी विमान वाहतूक संचालनालयाने त्यांच्यावर तीन वर्षांची बंदी घातली होती. अशा गंभीर कारवायांनंतरही त्यांना विमान चालवण्याची परवानगी कशी मिळाली, हा मोठा प्रश्न आहे.

व्हेंचर्स कंपनी संशयाच्या भोवऱ्यात!

हा अपघात घडला त्या विमानाची मालकी 'व्हेंचर्स' या खासगी कंपनीकडे होती.

**सुरक्षेची ऐशीतैशी:** राज्यातील अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या प्रवासाची जबाबदारी असताना, कंपनीने वैमानिकाच्या पार्श्वभूमीची चौकशी का केली नाही?

**हलगर्जीपणा की दुर्लक्ष?:** ज्या व्यक्तीला व्यावसायिक वैमानिक म्हणून काम करताना दोनदा निलंबित करण्यात आले होते, त्याला उपमुख्यमंत्र्यांचे विमान चालवण्यास देणे हा गंभीर गुन्हा मानला जात आहे. जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचारासाठी बारामतीला जात असताना हा अपघात झाला.

## जि.प. निवडणुकांबाबत आयोगाचा मोठा खुलासा!

मुंबई, दि. २९

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे महाराष्ट्र सध्या अभूतपूर्व धक्क्यात आहे. राज्याच्या राजकारणातील या महावादळाच्या अकाली विझण्याने सर्वच राजकीय व्यवहार ठप्प झाले असताना, आगामी जिल्हा परिषद निवडणुकांचे काय? असा प्रश्न आता गावागावांत चर्चिला जात आहे. शोकाकुल वातावरणात मतदान होणार की निवडणुका लांबणीवर पडणार? यावर राज्य निवडणूक आयोगाच्या गोटातून अत्यंत महत्त्वाची माहिती समोर येत आहे. अजितदादांच्या सन्मानार्थ राज्य सरकारने ३० जानेवारीपर्यंत तीन दिवसांचा शासकीय दुखवटा जाहीर केला आहे. मात्र, निवडणूक आयोगाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, निवडणुकांच्या अधिकृत वेळापत्रकात कोणताही बदल होण्याची शक्यता नाही. ''राज्याच्या मुख्य पदावरील व्यक्तीचे निधन ही अतिशय दुःखद घटना असली, तरी नियमावलीनुसार यामुळे संपूर्ण निवडणूक प्रक्रिया स्थगित करण्याची तरतूद नाही,'' असे स्पष्ट करण्यात आले आहे.

## अजितदादांच्या खुर्चीवर आता वहिनी बसणार ?

### झिरवाळांच्या एका मागणीनं महायुतीत खळबळ

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
मुंबई, दि. २९

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होऊन २४ तास उलटत नाहीत, तोच राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये (अजित पवार गट) वारसा युद्धाची ठिणगी पडली आहे. अजितदादांसारखा कणखर नेता गमावल्याने पोरक्या झालेल्या राष्ट्रवादीला आता सावरणार कोण? या प्रश्नाचे उत्तर मंत्री नरहरी झिरवाळ यांनी थेट सुनेत्रा पवार यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवून दिले आहे. झिरवाळ यांच्या या मागणीने पक्षांतर्गत समीकरणांना वेगवान वळण दिले असून, ''वहिनींना उपमुख्यमंत्री करा,'' हा सूर आता जोर धरू लागला आहे.

अजितदादांच्या अंत्यविधीनंतर भावूक झालेल्या नरहरी झिरवाळ यांनी थेट सुनेत्रा वहिनींचे नाव उपमुख्यमंत्रिपदासाठी पुढे केले. ते म्हणाले, ''दादांनी हा पक्ष रक्ताचं पाणी करून उभा केला. आज तो टिकवायचा असेल, तर पवार कुटुंबातील व्यक्तीच





पुढे हवी. सुनेत्रा वहिनींना मंत्रिमंडळात स्थान देऊन उपमुख्यमंत्री करणे, हीच कार्यकर्त्यांची भावना आहे. वरिष्ठ नेत्यांनी याचा गांभीर्याने विचार करावा.'' झिरवाळ यांच्या या विधानामुळे पक्षातील इतर ज्येष्ठ नेत्यांच्या भुवया उंचावल्या आहेत.

राष्ट्रवादीमध्ये नेतृत्व करू शकणारे अनेक चेहरे आहेत, मात्र सद्यस्थितीत निर्माण झालेली पेचप्रसंग पाहता दोन प्रवाह दिसत आहेत:

सुनेत्रा पवार सध्या राज्यसभा खासदार आहेत. त्यांना राज्याच्या राजकारणात आणून उपमुख्यमंत्री केल्यास, विधानसभा निवडणुकीपूर्वी कार्यकर्त्यांमध्ये मोठी भावनिक लाट निर्माण होऊन पक्ष सावरला जाऊ शकतो.

छगन भुजबळ, सुनील तटकरे किंवा प्रफुल्ल पटेल यांसारखे नेते या प्रस्तावावर काय भूमिका घेतात, हे महत्त्वाचे आहे. अजितदादांच्या निधनानंतर एखादा कौटुंबिक चेहराच पक्षाला एकसंध ठेवू शकतो, की अनुभवी नेत्याकडे सूत्रे द्यावीत, यावर पक्षात दोन गट पडण्याची चिन्हे आहेत.

अजितदादांच्या निधनामुळे निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी भाजप आणि शिंदे गटही सावध पावले टाकत आहेत. दुसरीकडे, शरद पवार साहेबांच्या गटाकडूनही काही हालचाली होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सुनेत्रा पवारांना उपमुख्यमंत्री पद देऊन महायुती आपली वोट बँक टिकवणार की राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाची प्रक्रिया सुरू होणार? या प्रश्नाचे उत्तर येणाऱ्या काही दिवसांतच मिळेल.

सुनेत्रा वहिनींचे नाव पुढे आल्याने पार्थ पवार आणि जय पवार यांच्या सक्रिय राजकारणातील भूमिकेवरही चर्चा सुरू झाली आहे.

## शिंदेंना आत घेऊन या म्हणणारा माणूस आता उरला नाही : आनंद शिंदे

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
मुंबई, दि. २९



राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या अंत्यदर्शनासाठी राजकीय क्षेत्रासोबतच कला क्षेत्रातील दिग्गजांनीही मोठी गर्दी केली होती. प्रसिद्ध गायक आनंद शिंदे हेदेखील आपल्या लाडक्या नेत्याला शेवटचा निरोप देण्यासाठी पोहोचले होते, मात्र गर्दीमुळे त्यांना आत प्रवेश मिळू शकला नाही. यावेळी आपली खंत व्यक्त करताना ते अत्यंत भावुक झाले. ज्या दादांसोबत मी अनेक वर्षे उठलो-बसलो, आज त्यांच्याच दर्शनासाठी आत जाता आले नाही. आता फोन करताच शिंदेंना आत घेऊन या असे हक्काने सांगणारा माणूसच राहिला नाही, अशा शब्दांत त्यांनी आपले दुःख मांडले. एका जवळच्या मित्राला आणि खंबीर पाठीराख्याला गमावल्याची भावना व्यक्त करत त्यांनी हात जोडून तिथून निघणे पसंत केले.

युवाराष्ट्र दर्शन
# भंडारा जिल्हा
शुक्रवार दि.३० जानेवारी २०२६

## रथसप्तमी निमित्त आंतरशालेय सूर्यनमस्कार स्पर्धेत सनीज स्प्रिंग डेल शाळेचे यश



**भंडारा :** रथसप्तमीचे औचित्य साधून योगविद्याधाम शाखा, भंडारा यांच्या वतीने दिनांक २३ जानेवारी २०२६ रोजी आयोजित आंतरशालेय सूर्यनमस्कार स्पर्धेत सनीज स्प्रिंग डेल शाळेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले.

गट स्पर्धेत ५ ते ७ वर्ग गटात मुलांनी प्रथम क्रमांक, तर मुलींनी द्वितीय क्रमांक पटकावला. तसेच ८ ते १० वर्ग गटात मुलींनी द्वितीय क्रमांक मिळवला.वैयक्तिक स्पर्धेत ५ ते ७ वर्ग गट हर्षित वधवानी (मुले) यांनी प्रथम क्रमांक मिळवला. याच वर्ग गटातील साची पटेल (मुली) हिने प्रोत्साहनपर पारितोषिक पटकावले. ८ ते १० वर्ग गटात ग्रीष्मा तिघरे (मुली) व निकुंज लांजेवार (मुले) यांनी द्वितीय क्रमांक मिळवला.या यशाबद्दल शाळेचे संचालक सुनील मेंढे,प्राचार्या शेफाली पाल,कल्पना जांगडे, समृद्धी गंगाखेडकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

युवाराष्ट्र दर्शन
पत्रकार होण्याची सुवर्णसंधी
दैनिक युवाराष्ट्र दर्शन
वृत्तपत्राकरीता भंडारा जिल्ह्यातील लाखनी, लाखांदुर,पवनी येथे तालुका व शहर प्रतिनिधी नेमणे आहे. तसेच गाव पातळीवर वार्ताहर नियुक्त करणे आहे.
संपर्क मो.: ९९२३०७०३९२

# पवनी न.प.मध्ये 'खुर्ची' चा वाद
## नगराध्यक्षांचा जमिनीवर बसून कारभार!



### उपाध्यक्षांना वेगळा कक्ष असताना, अध्यक्षांच्या कक्षात का? : नगराध्यक्ष नंदुरकर

नगर परिषदेत उपाध्यक्षांचा वर वेगळा कक्ष आहे. काही दिवस ते तिथे बसले. अचानक अध्यक्षांच्या कक्षामध्ये खुर्ची टाकण्याचा प्रकार विचित्र होता. काही महत्त्वाचे कागदपत्र किंवा अनुचित प्रकार घडण्याच्या शंकेने साधेपणाने आम्ही उपाध्यक्षांसोबत बोललो. मात्र त्याचा गैरसमज करून अध्यक्षांच्या कक्षाला भाजपच्या लोकांनी कुलूप लावले. आता जिल्हाधिकारी आणि नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी हा कक्ष कोणाचा आहे स्पष्ट केल्यानंतरच कक्षात बसून कारभार करू. माझ्या पतीच्या हस्तक्षेपा संदर्भात केलेले आरोप पूर्णपणे चुकीचे आणि निराधार असल्याचे नगराध्यक्षा डॉ. विजया नंदुरकर म्हणाल्या.

### फक्त एका दिवसाचा विषय होता! उपाध्यक्ष सोनू बावनकर

कक्षाची साफसफाई सुरू असल्याने केवळ एक दिवस उपाध्यक्षांच्या कक्षात बसण्याचा विषय होता. मात्र अनुचित प्रकार आणि गुप्ततेच्या नावाखाली माझी खुर्ची बाहेर काढून, अध्यक्षांच्या पतीनेच कक्षाला कुलुप लावले. त्यांचा हस्तक्षेप चुकीचा असून आमच्यावर केले जाणारे आरोप खोटे आहेत. आधी ज्याप्रमाणे दोन खुर्च्या अध्यक्षांच्या कक्षात होत्या तशाच कायम राहावे एवढीच मागणी असल्याचे उपाध्यक्ष सोनू बावनकर यांनी सांगितले.

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :** सत्ता स्थापन होऊन काही कालावधी जात नाही तोच पवनी नगरपालिकेत खुर्चीचा वाद रंगल्याचे दिसते. अध्यक्ष राष्ट्रवादीच्या आणि बहुमत भाजपला अशी विचित्र स्थितीच यामागचे कारण आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. दरम्यान आज नगराध्यक्ष विजया नंदुरकर यांनी पालिका कार्यालयात त्यांच्या कक्षात न बसता खाली बसून कामकाज हाताळल्याने वादाची चर्चा रंगली आहे. याची सुरुवात २५ जानेवारी पासून झाल्याचे समजते.

पवनी नगर परिषदेत नगराध्यक्ष म्हणून नागरिकांनी राष्ट्रवादीच्या डॉ. विजया नंदुरकर यांना कौल दिला. मात्र दुसरीकडे सर्वात मोठा पक्ष म्हणून भारतीय जनता पार्टी पालिकेत उदयास आली. २० पैकी १३ नगरसेवक भाजपाचे निवडून आले. त्यामुळे पालिकेत राजकीय कुरघोडी होणार हे स्पष्ट होते. दरम्यान २५ जानेवारी पासून याला सुरुवात झाली असे म्हणता येईल.

२५ जानेवारी रोजी उपाध्यक्ष असलेल्या सोनू बावनकर यांनी नगराध्यक्षांच्या कक्षात स्वतःची खुर्ची लावून लोकांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. या विषयाला घेऊन नगराध्यक्ष व त्यांच्या पतीने आपल्याला जाब विचारल्याचे उपाध्यक्षांची म्हणणे आहे. सोबतच आपली खुर्ची कक्षातून बाहेर काढून तेथे कुलूप लावल्या गेल्याचा आरोपही उपाध्यक्ष बावनकर यांनी केला होता. तर आपल्या कक्षात परवानगी न घेता अनधिकृत प्रवेश करून, नंतर उपाध्यक्ष व त्यांच्या नगरसेवकांनी कुलूप लावल्याचा आरोप नगराध्यक्ष विजया नंदुरकर यांनी केला. या विषयाला घेऊन नगराध्यक्ष नंदुरकर यांनी नगरपालिकेचे मुख्याधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यांना पत्र लिहून नेमका कक्ष कुणाचा याचा खुलासा करून लिखित स्वरूपात द्यावे अशी विनंती केली आहे. अजून पर्यंत या संदर्भात काहीच मिळाले नसल्याने आज नगराध्यक्षांनी चक्क नगरपालिकेच्या पोर्च मध्ये खाली बसून कामकाज केले. त्या ठिकाणी फाईलचा निपटारा करतानाचे फोटो समाज माध्यमांवर पसरले आणि खुर्चीचा हा वाद चर्चेत आला. सत्ता स्थापन होऊन दोन महिनेही झाले नाही मात्र पालिकेत प्रारंभ झालेल्या सत्ता नाट्याची सुरुवातच अशी झाल्याने पुढे आणखी काय होणार? हे समजू शकतो. दरम्यान अध्यक्ष आणि उपाध्यक्ष दोघांनीही एकमेकांवर आरोप करीत आपण आपण बरोबर असल्याचे म्हटले आहे.

## न्याय मागणीसाठी माजी पोलीस पाटलाचे पुन्हा आमरण उपोषण सुरू




युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :** वरठी पोलीसांनी खोटा गुन्हा दाखल करून आरोपी केल्याने वरठी पोलीस स्टेशनचे ठाणेदार निलेश गिरी यांच्यावर कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी माजी पोलीस पाटलाने भंडारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे.विशेष म्हणजे यासंदर्भात याअगोदर सुध्दा माजी पोलीस पाटील चव्हाण हे आमरण उपोषणावर बसले होते तेव्हा झालेल्या चर्चेमध्ये देण्यात आलेल्या आश्वासनाची पुर्तता न झाल्याने चव्हाण यांनी पुन्हा एकदा आमरण उपोषणाचे हत्यार उपसले आहे.

वरठी पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी यांनी फोन लावून माजी पोलीस पाटील प्रतिम चव्हाण रा. पाहुणी पोस्ट खात त. मोहाडी जिल्हा भंडारा यांना पंच म्हणून घटनास्थळी बोलविले होते . मात्र तिथे त्यांच्यावरच गुन्हा दाखल करून चव्हाण यांना आरोपी करण्यात आले. मला पोलीस कर्मचाऱ्यांनी फोन करून बोलविले. म्हणून मी घटनास्थळी हजर झालो. त्याच घटनेत मला आरोपी आणि पंच पोलिसांनी कसे का बनविले? असा प्रश्न चव्हाण यांनी उपस्थित केला आहे. या प्रकारामुळे त्यांची समाजात बदनामी होऊन यांच्यावर अन्याय झाला आहे. त्यामुळे त्यांनी दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी बेमुदत आमरण उपोषण सुरू केले होते. दरम्यान पोलीस अधीक्षक नूरूल हसन यांनी आपल्या कार्यालयात बोलून चर्चा केली.दोन दिवसात योग्य ती चौकशी करून कारवाई करून व तुम्हाला दोष मुक्त करू असे आश्वासन दिले. आणि उपविभागीय पोलीस अधिकारी काळे यांना तसे आदेश दिले. मात्र त्यांनी दिलेले आश्वासन हवेतच विरल्यामुळे दिनांक २७ जानेवारी २०२६ पासून माजी पोलीस पाटील चव्हाण यांनी जिल्हाधिकारी कार्यालय भंडारासमोर पुन्हा न्याय मागणीसाठी बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे.

सदर प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करावी व त्याचा अहवाल मला द्यावा तसेच पोलीस ठाणेदार निलेश गिरी यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी करण्यात आलीआहे

## नाल्यात पडलेल्या एकाचा मृत्यू

**भंडारा :** तालुक्यातील शहापूर जवळील नाल्यात एक व्यक्ति फिट येवून पडला. त्यात त्याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. राहुल सुखदेव आरके (५५) रा. शहापूर असे मृतकाचे नाव आहे.मृतक हा एकटाच राहत होता. मुलाच्या मृत्यूनंतर त्याला दारूचे व्यसन जडले होते. तसेच त्याला फिट येत असल्याने कुठेही पडून राहत होता. तो गावाजवळील वाकडा पूलाकडे गेला असता अचानक त्याला फिटचा झटका येवून नाल्यात पडला. त्यात त्याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला.

## सैराट फेम रिंकु राजगुरु (आर्ची) २ फेब्रुवारी रोजी बेला येथे



युवाराष्ट्र दर्शन /

**भंडारा:** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानातंर्गत मराठी चित्रपट सैराट फेम अभिनेत्री रिंकु राजगुरु (आर्ची) २ फेब्रु रोजी भंडारा जिल्ह्यात असणार आहे. या अभियानातंर्गत त्या बेला ग्रामपंचायतला भेट देणार आहे.

रिंकु राजगुरु व राज्यस्तरीय चमु भंडारा येथे १ फेब्रुवारी रोजी सायंकाळी दाखल होणार असुन भंडारा येथे त्या मुक्कामी राहणार आहेत. दुसऱ्या दिवशी २ फेब्रुवारी भंडारा तालुक्यातील बेला ग्रामपंचायत येथे सकाळी ९.४० वाजता भेट देऊन राज्यस्तरीय चमुसह मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत प्रचार प्रसिद्धी कार्यक्रमाला उपस्थित राहुन पुढील कार्यक्रमाला रवाना होतील. सदर प्रचार प्रसिद्धी कार्यक्रमाला नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा परिषद प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## तुमसर येथे चरण वाघमारे यांच्या उपस्थितीत प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा




युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**तुमसर :** भारतीय प्रजासत्ताक दिनाचा अमृत काळ साजरा होत असताना, तुमसर येथे विकास फाउंडेशन भंडारा जिल्हा, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) आणि गुंज हॉटेल अँड रिसॉर्ट यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य ध्वजारोहण सोहळा आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाला माजी आमदार तथा जिल्हाध्यक्ष आदरणीय चरणभाऊ वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

सोमवारी सकाळी ठीक ९:१५ वाजता गुंज हॉटेल अँड रिसॉर्टच्या प्रांगणात मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकवून सलामी देण्यात आली. यावेळी 'भारत माता की जय' आणि 'वंदे मातरम' च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.

कार्यक्रमाचे संचालन अनिल जिभकाटे यांनी केले. त्यांनी आपल्या ओघवत्या शैलीत प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व आणि संविधानाची महती विषद केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राबलेल्या सर्व कार्यकर्त्यांचे आणि उपस्थित नागरिकांचे आभार छोटूभाऊ तुरकर यांनी मानले. याप्रसंगी विकास फाउंडेशनचे पदाधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा व तालुका स्तरावरील कार्यकर्ते, गुंज रिसॉर्टचे व्यवस्थापन आणि तुमसर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांना अल्पोपहार देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## सार्वजनिक वाचनालयात अजितदादा पवारांना श्रद्धांजली



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना सार्वजनिक वाचनालय भंडाराच्यावतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष धनंजय दलाल हे होते. याप्रसंगी धनंजय दलाल यांनी अजितदादा पवार यांचेशी त्यांचे प्रत्यक्षात आलेले अनुभव सांगितले.शिस्त, परखडपणा, निर्भिड मत मांडण्याची हिमंत आणि निर्णय घेताना कुणाचाही विचार न करता फक्त राज्याच्या हिताचा विचार करणारा नेता म्हणजे अजितदादा पवार, दादा रागवायचे पण तेवढच प्रेम करायचे असा नेता वारंवार जन्माला येत नाही असे सांगितले.

या शोकसभेला वाचनालयाचे कार्यवाह प्रा.सुमन्त देशपांडे, कार्यकारी मंडळ सदस्य नीळकंठराव रणदिवे,डॉ. गुरूप्रसाद पाखमोडे, गुणवंत काळबांडे, मदन बागडे, अविनाश पाठक, प्रा.नरेश आंबिलकर, धनंजय ढगे, सौ. मंगला निंबार्ते. सौ. प्रितीताई कढव, श्रीमती मंगला भोले ,घनश्याम कानतोडे,महेश साखरवाडे सुधीर खोब्रागडे, युवराज साठवणे दिनेश हरडे,मारोती वाघमारे उपस्थित होते. .

## अख्ख्या गावात हरिनामाचा गजर

**लाखांदूर :** तालुक्यातील तिरखुरी येथील सार्वजानिक हनुमान मंदीरात दि.२४ जानेवारी पासुन श्रीमद हरिनाम भागवत सप्ताह सूरु असून भागवताचार्य ह.भ.प.भागवत चाचेरे महाराज यांच्या सुश्राव्य अमृततुल्य वाणीतून ज्ञानपाठ, रामधून, प्रवचन, हरिपाठ,भारुड केल्या जात आहे.यातून संपूर्ण गाव भक्तिभावाने न्हाऊन निघाले आहे. शुक्रवारी ३० जानेवारीला दुपारी २ वाजता गोपालकाला व भव्य महाप्रसादाचे आयोजन केलेले आहे.

## साकोली येथे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांना श्रद्धांजली



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**साकोली :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनामुळे अख्खा महाराष्ट्र स्तब्ध झाला. साकोलीत ( गुरू. २९ जाने.) ला उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांना सामुहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली व शोक सभेचे आयोजन करण्यात आले.

जूने पंचायत समितीचे प्रांगणात या श्रद्धांजलि व शोकसभा कार्यक्रमात माजी आमदार डॉ. हेमकृष्ण कापगते, भाजपा नेते अविनाश ब्राह्मणकर, नगराध्यक्षा देवश्री मनिष कापगते, प्रा. होमराज कापगते, सरपंच नंदू समरीत, अश्विन नशिने, प्रकाशराणा मेश्राम, भोजराम कापगते, सुरेश बघेल, विजय दूबे, नंदू पटले, ओमप्रकाश गायकवाड, ग्यानीराम गोबाडे, अंगराज समरीत, सतिश समरीत, नामदेव शेंडे, हेमकृष्ण वाडीभस्मे, रवि परशुरामकर, प्रभाकर सपाटे, प्रविण भांडारकर, दिपक थानथराटे, अखिलेश गुप्ता, नगरसेविका मेघा बडवाईक, मीना लांजेवार, रेणू गणविर, प्रिती डोंगरवार, प्रिती भांडारकर, जया भुरे, लता द्रुगकर, आशा शेंडे, माहेश्वरी नेवारे, भिमावती पटले यांसह सर्वपक्षीय राजकीय पदाधिकारी व पुढारी आणि सामाजिक कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

## डव्वा येथे हळदी कुंकू कार्यक्रमाचे थाटात उद्घाटन

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :** विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा व त्यांचे उपजत गुण प्रदर्शित व्हावे या उद्देशाने जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा डव्वाच्या वतीने हळदी कुंकू कार्यक्रम व स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन ग्रामपंचायत डव्वाच्या सरपंच संध्या निंबार्ते यांच्या हस्ते थाटामाटात करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अंतकलाबाई निंबार्ते अध्यक्षा शाळा व्यवस्थापन समिती या होत्या. याप्रसंगी सरपंच संध्या निंबार्ते यांनी शाळेत राबवीत असलेल्या विविध उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास होत आहे हे खरोखरच कौतुकास्पद असून ग्रामपंचायत भविष्यात शाळेच्या उपक्रमात सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

## आज धामणी (चौ.) येथे तीन दिवशीय धम्म महोत्सव व अनावरण सोहळा

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**पवनी :** तालुक्यातील धामणी (चौ) येथे त्रिदिवसीय धम्म महोत्सव व अनावरण सोहळ्याचे आयोजन संघमित्रा बौद्ध विहाराचे प्रांगणात आज दिनांक ३० जानेवारीपासून करण्यात आले असून उदघाटनिय समारंभात जगविख्यात धम्मगुरु आचार्य संघरत्न माणके यांची प्रामुख्याने उपस्थिती राहणार आहे. दरम्यान विविध कार्यक्रमाची रेलचेल पाहायला मिळणार आहे.

शुक्रवारला पहिल्या दिवशी ठीक ११ वाजता तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेची प्रतिष्ठापना व बुद्ध विहाराचे उदघाटन होणार असून भदंत संघरत्न मणके यांचे हस्ते होणार आहे. याप्रसंगी भिक्खूनी संघ उपस्थित राहणार आहे. तसेच दुपारी २ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूणार्कृती पुतळ्याचे अनावरण नानाभाऊ पंचबूध्दे माजी राज्यमंत्री यांचे हस्ते करण्यात येणार असून कार्यक्रमाची अध्यक्षता बंडूभाऊ सावरबांधे माजी राज्यमंत्री हे भूषविणार आहेत. याप्रसंगी पंढरीनाथ सावरबांधे, धनंजय दलाल, डॉ. विजया नंदूरकर, विकास राऊत, शैलेश मयूर, अविनाश ब्राम्हणकर, विजय सावरबांधे, मनोज बनसोड, अरुण गोंडाने, लोमेश वैद्य, गोपाल सावरबांधे, प्रा. सुरेश खोब्रागडे, प्रा. मोरेश्वर गेडाम, मोहन लांजेवार, अनमोल देशपांडे, संगीता बोरकर, संगीता हुमने, किरण कांबळे इत्यादींची उपस्थिती राहणार आहे.

रात्री ८ वाजता सांस्कृतिक कार्यक्रम होणार असून उदघाटन दिलीप आकरे करणार आहेत. कार्यक्रमाची अध्यक्षता लोकेश भेडारकर करणार आहेत.

दुसऱ्या दिवशी दि. ३१ जानेवारीला सकाळी ८ वाजता प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून प्रमुख वक्त्या म्हणून अ‍ॅड. सुषमा भड तर अध्यक्ष म्हणून अ‍ॅड. स्मिता कांबळे व इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत. रात्री ८ वाजता फैजानभाई ताज यांचा संगीतमय प्रबोधन कार्यक्रमाची मेजवानी मिळणार आहे. दिनांक १ फेब्रुवारीला दुपारी १२ वाजता माता रमाबाई आंबेडकर यांच्या पूणार्कृती पुतळ्याचे अनावरण आमदार संजय मेश्राम उमरेड यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षता आमदार नरेंद्र भोंडेकर भूषवतील. रात्री ८ वाजता एकपात्री चळवळ प्रयोगाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर तीन दिवशीय धम्म सोहळ्यात जनतेनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आव्हान बौद्ध समाज, रमाई महिला मंडळ, संत गाडगेबाबा स्वयं सहायता बचत गट, भागवत मंडळ व समस्त ग्रामवासी धामणी यांनी केले आहे.

## मोहाडी तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेसतर्फे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**मोहाडी :** मोहाडी तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वतीने आज दिनांक २९ जानेवारी २०२६ रोजी मोहाडी येथील आमदार कार्यालयात महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

बारामती येथील विमान दुर्घटनेत राज्यातील लोकप्रिय जननेता स्व अजितदादा पवार यांचे दुःखद निधन झाले. जनसेवेचा वसा, कणखर नेतृत्व, व प्रशासनावर जबर पकड असलेले, सर्वसामान्य जनतेचे लाडके नेतृत्व, लोकप्रिय जननेता स्व अजितदादा पवार यांचे दुःखद निधन झाल्याने राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी मोहाडी तालुका पक्षाच्या परिवारासह संपूर्ण महाराष्ट्राच्या जनतेसाठी काळा दिवस ठरला आहे. त्यांच्या चरणी श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी मोहाडी तालुका राष्ट्रवादी कांग्रेस पार्टीच्या वतीने आमदार कार्यालय मोहाडी येथे श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले. त्यांच्या प्रतिमेला पुष्पवाहून अश्रूपूर्ण व भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत ईश्वर मृत आत्म्यास शांती देवो अशी प्रार्थना उपस्थितांनी केली.



या प्रसंगी, आमदार राजू कारेमोरे तुमसर विधानसभा अध्यक्ष, महिला जिल्हा अध्यक्ष सरिताताई मदणकर, तालुका अध्यक्ष सदाशिव ढेंगे, प्रदेश उपाध्यक्ष रिताताई हलमारे,सभापती नरेश ईश्वरकर, सभापती आनंद मलेवार, सभापती अनितातांई नलगोपुलवार सभापती जगदीश शेंडे, जिल्हा उपाध्यक्ष सुभाष गायधणे, जिल्हा महासचिव विजय पारधी, उपसभापती देवा चकोले, माजी सभापती रितेश वासनिक, शहर अध्यक्ष पवन चव्हाण, जिल्हापरिषद सदस्य महादेव पचघरे, युवक अध्यक्ष रोहित बुरडे, महिला शहर अध्यक्ष मनीषा गायधणे, युवती अध्यक्ष सोनूताई तरारे, पंचायत समिती सदस्य, प्रीतीताई शेंडे,उमेश भोंगाडे, बानाभाऊ सव्वालाखे, माजी पस सदस्य केशव बांते, जगदिस उके, महादेव बुरडे,परमेश्वर नलगोपुलवार, हैशोक शरणागते,प्रभाकर बारई नगरसेवक सुमन मेहर, रेखाताई हेडाऊ, हर्षल गायधणे, लालाजी तरारे,शैलेश गभने, रागिणीताई शेलोकर, हेमचंद पराते, ईश्वर माटे,वंदना पराते, सुभाष भाजीपाले,प्रतिमा राखडे,याकूब बर्वे, राजू सोयाम, महादेव फुसे, गणेश बोन्द्रे, देवाजी पाचघरे, विलास बांडेबूचे, शरद रोटके, लीलाधर धार्मिक, प्रवीण साठवणे, लीलाधर कांबळे, भगवान घोनमोडे, नितीन भोयर, दिगंबर निमजे, उमेश दमाहे, मुकेश आगासे, रुपेश माटे, बामन चकोले, दिनेश तितीरमारे, गंगाधर कांबळे, प्रेमळ कांबळे, विशवनाथ कांबळे, गोविंद आगासे, अमोल मते, सौरभ शेलोकर, किसन शेलोकर, ऋषभ साखरवाडे, सुधीर रामटेके, निखिल काळे, ईश्वर मते, शंकर गाढवे, गणेश निपाने,धनराज चिंधालोरे, भावडस खोब्रागडे, उमेश भुते, रत्नाकर भोयर, मोरेश्वर ठोंबरे, राजेंद्र मेहर, भूषण गभणे, शुभम पिंगरे, मनोहर राखडे, दिनेश गायधणे, उमेश उपरकर, संजय गाढे, प्रमोद बेलेकर, नथू माटे, ताराचंद खापेकर, शशिकांत मते, शिवशंकर पेसने, नावेद शेख, रामभाऊ कळबे, बसंत कुंभारे, योगेश येलने, गणेश चोपकर, सतीश बांते, सुरेश घरजारे, अंकुश चकोले, सुमित पाटील, अतुल भोवते, कैलास तितीरमारे, वंदना पराते, प्रभा आगासे, मोरेश्वर हेडाऊ, अनिता तेलंग, राधिका आंबागडे,मिनाज शेख, निशा चव्हाण, नितीन कांबळे, कोमल गायधणे, केसव बांते, व अन्य पदाधिकारी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

